# महाराष्ट्र शासन

क्रमांक : युएसजी २०१०/(४७२/१०)-विशि-१,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : २८ जुलै, २०१०.

~~प्रति,~~

कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे.

विषय : महाविद्यालयीन ग्रंथपाल पदास प्राचार्य पदाच्या नियुक्तीसाठी
पात्र धरण्याबाबत.

संदर्भ : १. नागपूर विद्यापीठ महाविद्यालयीन ग्रंथपाल संघटना, नागपूर यांचे
एनयुसीएलए/००८/२०१०, दिनांक २९-४-२०१०. चे पत्र.
२. शासनाचे क्र.युएसजी २०९९/४२२६३/(४७७७)/विशि-४,
दिनांक ११ नोव्हेंबर, २००३ चे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधीन पत्रास अनुसरुन असे कळविण्यात येते की, शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक एनजीसी १२००/७१९३/(५/००)/विशि-४, दिनांक १३ ऑक्टोबर, २००० अन्वये महाविद्यालयीन प्राचार्यासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभव विहित करण्यात आला आहे.

२. सदर शासन निर्णयातील अर्हतेप्रमाणे प्राचार्य पदावरील नियुक्तीसाठी शिकविण्याचा किंवा संशोधनांचा अनुभव विहित करण्यात आलेला आहे.

३. शारिरीक शिक्षण संचालक हे क्लासरुम शिक्षक नसल्यामुळे त्यांना प्राचार्य पदासाठी पात्र ठरविण्यात यावे किंवा कसे, याबाबत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्याकडून दि.६ मार्च, १९९९ च्या पत्रान्वये शासनाकडे विचारणा करण्यात आली होती. शिवाजी विद्यापीठाच्या सदर पत्राच्या अनुषंगाने शासनाने संदर्भाधीन क्र.२ येथील ११ नोव्हेंबर, २००३ च्या पत्रान्वये शारिरीक शिक्षण संचालक हे केवळ क्लासरुम शिक्षक नसल्यामुळे त्यांना प्राचार्य पदावरील नियुक्तीपासून वंचित करता येणार नाही. त्यामुळे दि.१३ ऑक्टोबर, २००० च्या शासन निर्णयाप्रमाणे आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभव असल्यास शारिरीक शिक्षक संचालकांना प्राचार्य या पदावर नियुक्ती देता येईल, असे सर्व संबंधितांना कळविण्यात आलेले आहे.

४. वर नमूद शारिरीक शिक्षण संचालक या पदा प्रमाणेच महाविद्यालयीन ग्रंथपाल हे पद सुध्दा शिक्षक समकक्ष/संवर्गातील पद आहे. त्यामुळे सदर पद सुध्दा केवळ क्लासरुम शिक्षक नाही (वर्गात शिकविण्याचा अनुभव नाही) या कारणास्तव त्यांना प्राचार्य पदावरील नियुक्तीपासून वंचित करता येणार नाही.

५. सबब, दि.१३ ऑक्टोबर, २००० च्या शासन निर्णयाप्रमाणे आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभव असल्यास महाविद्यालयीन ग्रंथपालाना प्राचार्य या पदावर नियुक्ती देता येईल, ही बाब आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व महाविद्यालयांच्या निदर्शनास आणावी, ही विनंती.

आपला,

( विकास तु. कदम )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :

संचालक,
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,

सर्व विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण,

डॉ. दत्तात्रय देशपांडे,
अध्यक्ष, नागपूर विद्यापीठ महाविद्यालयीन ग्रंथपाल संघटना,
९२, "श्री स्वामी कृपा", गजानन नगर,
अभयनगर जवळ, रिंग रोड,
नागपूर - २७.